दैनिक अन्यायाचा प्रतिकार, महाराष्ट्राचा बुलंद आवाज

मुख्य संपादक : सुनील कृष्णाजी पोतदार

# रायगड नगरी

रायगडसह ठाणे, नवी मुंबई, पुणे येथून प्रकाशित

● वर्ष १७ वे ● अंक ९७ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● गुरुवार दि.७ जुलै २०२२ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

## पेण तालुक्याला पावसाने झोडपले : पुर सदृश्य परस्थिती



**दै.रायगड नगरी । पेण**

पेण तालुक्याला सतत तिन ते चार दिवस पडणाऱ्या मुसळधार पावसाने झोडपुन काढले आसुन पेण तालुक्यात पुर सदुश परिस्थिती निर्माण झाली असुन भात शेतीत पाणी साठल्याने भाताची रोपे कुजुन जाण्याची भिती निर्माण झाली असुन शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होण्याची शक्यता आहे. तर काही गावात नंदी नाल्याना पुर आल्याने पाणी गावात घुसल्याने जनजीवन विस्कळीत झाले आहे.

सतत पडणारा पाऊस यामुळे गेल्या चार दिवसांपासून पेण तालुक्यातील गडब, वडखळ, आमटेम, खारपाले, कासु, पांडापुर, कोळवे, खारपाडा, जिते, बोरी, खरोशी, कळवे, जोहे, तांबडशेत आदि ग्रामीण भागातील शेतात पाणी साचले आहे. भाताची रोपे पाण्याखाली असल्याने त्या इवल्याशा रोपांना सूर्यप्रकाश न मिळाल्याने वाढीची प्रक्रियाच मंदावल्याने भाताची रोपे कुजून वाया जाणार असल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. यामुळे शेतकऱ्यांचे नुकसान होणार आहे. पेणमध्ये गेल्या पाच दिवसा पासुन पेण तालुक्यात ग्रामिण भागात जोरदार पाऊस पडत असून आता पावसाचा जोर वाढत आहे तरी भात पिकावर शेतात साचलेले पाणी पिकावर बसल्याने रोपाना यांचा फटका बसुन उत्पन्नावर परिणाम होणार आहे.



पेणला अंबा, भोगावती, पाताळगंगा, बाळगंगा नद्यांच्या प्रवाहाचा विळखा मान्सून हंगामात कायमच पडतो. या नद्यांच्या प्रवाहाचे पाणी पेणमधील धरमतर खाडीस्थित समुद्राला मिळते. गेल्या चार दिवसात या नद्या आक्राळविक्राळ रूप धारण करीत वाहत आहेत. नद्यांच्या प्रवाहाचे पाणी समुद्राला आलेली भरती आणि दमदार पडणारा पाऊस त्यामुळे संपूर्ण ग्रामीण भागातील शेतीमध्ये पाण्याची पातळी वाढली आहे. शिवारात पाणी भरल्याने खरिपात कामकाज करणारा शेतकरीही पावसामुळे अडकला तो थेट घरी विसावला. पाण्याच्या ओझ्याखाली पीक कुजणार असून, पावसाने असे नुकसान केल्याने शेतकरी चिंतातुर झाला आहे. निसर्गाचे लहरी पणामुळे शेती व्यवसाय परवडत नसल्याचे शेतकऱ्यांनी सांगितले.

पेण तालुक्यातील कांदळेपाडा गावात पुराचे पाणी गावात घुसल्याने येथील जनजिवन विस्कळीत झाले आहे. तर या ठिकाणी उपविभागिय अधिकारी विठ्ठल ईनामदार, तहसिलदार स्वप्नाली डोईफोडे यांनी भेट देवुन परस्थीतीची पाहणी करुन प्रशासनाला योग्य सुचना देवुन नागरिकांना सर्तक राहाण्यास सांगितले. तर तालुक्यातील डोगंराळ भागात आसलेल्या चांदेपट्टी गावाला भुसंख्यलनाचा धोका असल्याने तेथील लोकांचे स्थंलातर करण्यात आले आहे, तर बाळंगंगा नदि किनाऱ्यावरील खरोशी गावातील ४९ नागरिकांचे स्थलातंर करण्यात आले आहे.

## श्रीवर्धन प्रशासकीय यंत्रणेकडून दरड प्रवण क्षेत्राची पाहणी

### सचिन गोसावी तहसीलदार श्रीवर्धन यांचे सर्वसामान्य जनतेला आवाहन



**दै.रायगड नगरी । दिघी**

दिघी – जुलै च्या पहिल्या आठवड्यापासून श्रीवर्धन तालुक्यात सर्वत्र पावसाने जोर पकडला आहे. आपणास पावसामुळे कोणत्याही स्वरूपाचा धोका जाणवल्यास तात्काळ आपत्ती कक्षाशी संपर्क साधा .सजग रहा, सावधान रहा आपल्या मदतीसाठी प्रशासन सज्ज आहे असे आवाहन श्रीवर्धन चे तहसीलदार सचिन गोसावी यांनीकेले आहे.

दरड प्रवण क्षेत्राची पाहणी करत असताना स्थानिक नागरिकांशी सचिन गोसावी यांनी संवाद साधला. गोसावी यांनी सांगितले कुडगाव आदिवासी वाडी च्या लगत मोठा डोंगराळ भाग आहे पावसाळ्यात डोंगराच्या वरील बाजूनीं सर्व पाणी वाडी कडे येते त्यामुळे आपण सर्वांनी काळजी घेणे गरजेचे आहे.

श्रीवर्धन तहसील कार्यालयात आपत्ती कक्षाची स्थापना करण्यात आली. कोणतीही समस्या जाणवल्यास तात्काळ आपत्ती कक्षाशी संपर्क साधावा. श्रीवर्धन शहरा–तील धोंड गल्ली, गणेश आळी, विठ्ठल आळी या दरड प्रवण क्षेत्रातील स्थानिक व्यक्तींशी संवाद साधण्यात आला. तहसीलदार सचिन गोसावी, नगरपरिषदेचे मुख्याधिकारी विराज लबडे, गटविकास अधिकारी गजानन लेंडी, मंडळ अधिकारी कल्याण देऊळगावकर, मंडळ अधिकारी सुनील पाटील, तलाठी अर्जुन भगत यांच्या पथकाने प्रांताधिकारी अमित शेडगे यांच्या मार्गदर्शनानुसार श्रीवर्धन शहर, कुडगाव, हरवीत अशा विविध ठिकाणी दरड प्रवण क्षेत्रा–तील वास्तव्य करणाऱ्या नागरिकांची भेट घेऊन स्थानिक परिस्थितीची पाहणी केली आहे.

## पनवेल महापालिका क्षेत्रात प्लास्टिक बंदीची कठोर अंमलबजावणी सुरू

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल महापालिका क्षेत्रात १ जुलै २०२२ पासून एकल वापर (सिंगल बुज) प्लास्टिक बंदीची कठोर अंमलबजावणी करण्यास सुरूवात करण्यात आली आहे. आयुक्त श्री.गणेश देशमुख यांनी दिलेल्या निर्देशानुसार प्रतिबंधित प्लास्टीकची साठवणूक, विक्री आणि वापर करणाऱ्यांवर महानगरपालिकेच्यावतीने कठोर कारवाई करण्यात येणार आहे.

केंद्रीय पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाने अधिसूचना जारी केली आहे.तसेच सुधारित प्लास्टिक कचरा व्यवस्थापन नियम २०१६ नियम ४(२) अन्वयानुसार १ जुलै २०२२ पासून एकल वापर (सिंगल युज) प्लास्टिकचे उत्पादन,आयात, साठवण,वितरण विक्री आण वापरांवर बंदी असणार आहे. शहरा–तील व्यावसायिकांकडे प्रतिबंधित प्लॅस्टीकचा साठा असल्याची माहिती नागरिकांनी महानगरपालिकेला द्यावी, असे आवाहन महानगरपालिकेचे उपायुक्त कैलास गावडे यांनी केले आहे.

नागरिकांमध्ये प्लास्टिक बंदीविषयी जागृती निर्माण करण्याकरिता महापालिकेच्यावतीने विविध एनजीओची मदत घेतली जाणार असून, नुकतीच विविध एनजीओच्या पदाधिकाऱ्यांची एक बैठक मुख्यालयात उपायुक्त सचिन पवार यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. प्लॅस्टिक बंदी बद्दल नागरिकांचे प्रबोधन करण्याकरिता यावेळी चर्चा करण्यात आली. या पदाधिकाऱ्यांनी या कामी .../२

## शिवसेनेनंतर काँग्रेसमध्ये भूकंप

**दै.रायगड नगरी । मुंबई**

एकनाथ शिंदे यांनी शिवसेनेचे ३९ आमदार फोडून उद्धव ठाकरे यांना धक्का दिल्यानंतर महाराष्ट्राच्या राजकारणात मोठी उलथापालथ पाहायला मिळाली होती. एकनाथ शिंदे यांच्या बंडामुळे शिवसेना अक्षरश: खिळखिळी झाली होती. यामुळे झालेला राजकीय धुरळा खाली न बसतो तोच आता काँग्रेस पक्षात मोठा भूकंप होण्याची शक्यता आहे.

नुकत्याच झालेल्या विधानपरिषद निवडणुकीत काँग्रेस पक्षाच्या ७ आमदारांनी गुप्तपणे क्रॉस व्होटिंग केल्याची माहिती पुढे आली आहे. या ७ आमदारांवर पक्षाने कारवाई करावी, अशी मागणी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते पृथ्वीराज चव्हाण यांनी केली आहे.

पृथ्वीराज चव्हाण यांनी काँग्रेसचे महाराष्ट्र प्रभारी एच.के. पाटील यांची भेट घेतली. यावेळी त्यांनी हा सारा तपशील त्यांच्यापुढे मांडल्याचे समजते. विधानपरिषद निवडणुकीत चंद्रकांत हंडोरे हे काँग्रेस पक्षाचे पहिल्या पसंतीचे उमेदवार होते. मात्र, या निवडणुकीत त्यांचा पराभव झाला होता. चंद्रकांत हंडोरे यांना महाविकास आघाडीतील मित्रपक्षांच्या आमदारांनीही मतदान केले होते.

त्यामुळे विधानपरिषद निवडणुकीत वरकरणी काँग्रेसची तीन मतं फुटल्याचे दिसत असले तरी काँग्रेसची प्रत्यक्षात ७ मते फुटल्याचे समोर आले होते. ही अत्यंत गंभीर बाब आहे. त्यामुळे क्रॉस व्होटिंग करणाऱ्या ७ आमदारांवर पक्षाने कठोर कारवाई करावी, अशी मागणी पृथ्वीराज चव्हाण यांनी केली. त्यामुळे आता एच.के. पाटील दिल्लीत जाऊन हायकमांडकडे काय अहवाल देणार आणि त्यानंतर सोनिया गांधी कठोर पाऊल उचलणार का, हे पाहावे लागेल.

## मुसळधार पावसाचा फटका; जुने माणगांव पाणी पुरवठा लाईन उखडली

**दै.रायगड नगरी । उतेखोल/माणगाव**

माणगांव भादाव येथील भैरीचे मंदिरा जवळील रेल्वे ब्रिज खाली जुने माणगांव कडे जाणारी नगर पंचायतची पाणी पुरवठा लाईन पुराच्या पाण्याने उखडली असून मंगळवार दि. ५ जुलै रोजी दुपारी साडेबाराच्या सुमारास या भागातील पाणीपुरवठा बंद पडला आहे. त्यामुळे येथिल नागरिकांची गैरसोय झाली. पाईप लाईन खालील मातीचा ढीगारा धसल्याने या ठिकाणचे तिन पाईप उखडले असल्याचे प्रथम दर्शनी दिसुन येत आहे. नगरपंचायत जलशुध्दी केंद्रातून या लाईनचा पाणी पुरवठा सुरु असतानाचा हा प्रकार घडल्याने जुने माणगांवच्या नागरिकांनी पाणी बंद झाल्याची तक्रार केली.

जलशुध्दी केंद्रात पाणी पूरवठा व्यवस्थित सुरु असताना अचानक पाणी पूरवठा खंडीत झाल्याचे समजताच पाणीपूरवठा कर्मचारीही गोंधळले व तातडीने पाहणी करताना ही लाईन उखडल्याचे चित्र स्पष्ट झाल्याने या विभागातील मुख्य वाल्व बंद करण्यात आला. परंतु पुराचे पाणी असल्याने या ठिकाणी लगेच दुरुस्ती करणे अवघड असल्याने शक्य होणार नाही. गुरुवार दि. ६ जुलै रोजी या ठिकाणी जर पाणी कमी झाले, तरच पाईप जोडुन पाणी पूरवठा काही तासात सूरळीत करण्याचे काम सुरु करणार असल्याची माहिती पाणी पूरवठा .../२



## संभाव्य नैसर्गिक आपत्तीसाठी कर्जत नगर परिषद प्रशासन सज्ज

**दै.रायगड नगरी । कर्जत**

हवामान खात्याने पुढील काही दिवस मुसळधार पावसाचा दिलेला इशारा लक्षात घेता तसेच सध्या देखील पावसाचा जोर वाढल्याने पूर परिस्थिती निर्माण होऊन जीवित व मालमत्तेची हानी होऊ नये म्हणून शासन,प्रशासनाने सज्ज राहण्याचे निर्देश दिले आहेत या पार्श्वभूमीवर सन २०२२ नैसर्गिक आपत्तीसाठी कर्जत नगरपरिषद प्रशासन सज्ज झाले आहे नगरपरिषदेच्या वतीने आपत्ती व्यवस्थापन आराखडा तयार करण्यात आला आहे अशी माहिती नगरपरिषद कार्यालयाच्यावतीने देण्यात आली



संभाव्य नैसर्गिक आपत्ती चा पार्श्वभूमीवर कर्जत नगर परिषदेने काल दि.५ जुलै रोजी सायंकाळी ७ वाजता कर्जत नगर परिषदेच्या सभागृह एका बैठकीचे आयोजन केले होते, यावेळी नगराध्यक्ष सुवर्णा जोशी, उपनगराध्यक्ष अशोक ओसवाल, मुख्याधिकारी सुरेखा भणगे, नगरसेवक बळवंत घुमरे तसेच व्यापारी, विविध संस्थांचे पदाधिकारी आणि रेस क्यू टीमचे सदस्य आदी उपस्थित होते.

कार्यालयीन अधीक्षक जितेंद्र गोसावी यांनी प्रास्ताविकात मागील वर्षी पुराचे संकट आले होते त्यावर आपण सर्वांच्या सहकार्याने मात केली, यावर्षी आपत्ती व्यवस्थापन आराखडा तयार करण्यात आला आहे याबाबत त्यांनी सभागृहात माहिती दिली, उपस्थित पदाधिकारी, सदस्य यांना काही सूचना करायच्या असतील तर त्या सुचवाव्यात त्या मध्ये बदल करण्यात येईल असे सांगितले.

मुख्याधिकारी सुरेखा भणगे यांनी मागील नैसर्गिक आपत्तीची माहिती डोळ्यासमोर ठेवून हा विकास आराखडा तयार करण्यात आला आहे, यामध्ये शहरातील सर्व संस्था, व्यापारी, रेस क्यू टीम, नागरिक, पत्रकार यांचा समावेश करून हा आराखडा तयार करण्यात आला आहे, संभाव्य नैसर्गिक आपत्त–ीला तोंड देण्यासाठी आपल्या सर्वांच्या सहकार्याने नगरपरिषद प्रशासन सज्ज झाले आहे,नगरपरिषद कार्यालयात नियंत्रण कक्ष उघडण्यात आला आहे त्याठिकाणी नगरपरिषद कर्मचारी .../२

## पाली स्मशानभूमीची दुरवस्था ; मृतदेहाची होतेय हेळसांड

### एक मृतदेह दहनासाठी लागले साडेसहा तास ; नागरिकांमध्ये संताप

**दै.रायगड नगरी । सुधागड/पाली**

पाली बस स्थानकाजवळील अंबा नदी किनारी असलेल्या प्रमुख स्मशानभूमीची प्रचंड दुरवस्था झाली आहे. शिवाय स्मशानभूमीचे पत्रे फुटल्याने येथे भर पावसात मृतदेहावर अंत्यसंस्कार करावे लागत आहेत. सोमवारी (ता.४) येथे एक मृतदेह जाळण्यासाठी तब्बल साडेसहा तास लागले. तसेच ४५ लिटर रॉकेल व ४० टायरचा वापर करावा लागला. या असुविधेमुळे नागरिकांनी प्रचंड संताप व्यक्त केला आहे.

या स्मशानभूमीत विजेची व्यवस्था नाही. लाद्यांचे व सिमेंटचे बाकडे तुटले आहेत. तर काही समाजकंटकांनी ते तोडले आहेत. त्यामुळे अंत्यसंस्कारासाठी आलेल्या लोकांना बसण्यासाठी जागा नाही. स्मशानभूमीच्या एका बाजूची जमीन ढासळली आहे. त्यामुळे स्मशानभूमी नदीत ढासळण्याचा धोका आहे. यामुळे अपघात देखील घडू शकतो. स्मशानभूमीचे पत्रे .../२



## भर पावसात पाणजे गावातील रहिवाशांवर पाणी टंचाईचे संकट

**दै.रायगड नगरी । उरण**

उंच डोंगर वर वसलेल्या आणि चारी बाजूंनी समुद्राचे खारे पाणी यांनी वेढलेल्या पाणजे गावातील १५०० रहिवाशांवर भरपावसात पिण्याच्या पाण्याचे संकट ओढावले आहे.महिण्यातून पंधरा दिवसा आड पिण्याचे पाणी उपलब्ध होत असल्याने घराच्या कौलारू पागोळीचे पाणी पिण्याची नामुष्की रहिवाशांवर ओढवली आहे.जेएनपीए व सिडको बाधित गावांवर भरपावसात पिण्याच्या पाण्याचे संकट ओढावल्याने रहिवाशांमध्ये संतापाची लाट उसळली आहे.

उरण तालुक्यातील पाणजे हे गाव अरबी समुद्राच्या कुशीत वसलेले उंच डोंगरावरील गाव आहे.या गाव–ाला चारी बाजूंनी समुद्रातील खाऱ्या पाण्याने वेढले आहे.या गावातील रहिवाशांनी आपल्या जमिनी जेएनपीटी बंदराच्या उभारणीसाठी संपादित करुन दिल्या आहेत.मात्र असे असतानाही या गावातील रहिवाशांना नागरी सुविधा पासून वंचित राहावे लागत आहे.त्यात पंधरा दिवसा आड पिण्याचे पाणी उपलब्ध होत असल्याने भरपावसात ही गावातील १५०० रहिवाशांना पिण्याच्या पाण्यासाठी संघर्ष करावा लागत आहे.तरी पाणजे ग्रामपंचायत,उरण पंचायत समितीचे गटविकास अधिकारी,उरण तहसिलदार, जेएनपीए बंदर प्रशासन, सिडकोचे अभियंता यांनी पाणजे गावातील रहिवाशांना भेडसावणारी पिण्याची पाण्याची समस्या दूर करण्यासाठी तात्काळ उपाययोजना करावी अशी मागणी पाणजे गावातील रहिवाशी विशेष करून महिला वर्ग करत आहेत. पाणजे गावातील रहिवाशांना भेडसावणारी पिण्याची पाण्याची समस्या दूर करण्यासाठी आमदार महेश बालदी यांना ग्रामपंचायतीने साकडे घातले, आमदारांच्या पुढाकाराने जेएनपीटी बंदर प्रशासनाने पाणजे व हनुमान कोळीवाडा या दोन ग्रामपंचायतीसाठी संयुक्त निधी उपलब्ध करून दिला आहे.त्यामुळे नव्याने जलवाहिनी टाकण्याचे काम हे ठेकेदारांच्या माध्यमातून सुरू आहे.

# जिल्हा परिषदा व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक-२०२२ आरक्षण सोडतीचा कार्यक्रम जाहीर

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम ,१९६१ मधील कलम १२ उपकलम(१),कलम ५८(१)(अ) प्रमाणे व महाराष्ट्र जिल्हापरिषदा व पंचायत समित्या(जागांच्या आरक्षणाची पध्दत व चक्रानुक्रम) नियम,१९९६ नुसार अनुक्रमे जिल्हापरिषद व पंचायत समिती क्षेत्रात सभा घेवून अनुसुचित जाती/अनुसुचित जमाती (स्त्रियांच्या आरक्षणासह) राखून ठेवावयाच्या जागा आणी उर्वरीत स्त्रियांसाठी राखून ठेवावयाच्या जागा निश्चित करावयाच्या आहेत.त्याकरीता आरक्षण निश्चित करण्याकरीता सोडत काढणे तसेच आरक्षणाचे प्रारुप प्रसिध्द करून त्यावर हरकती व सूचना सादर करण्यासाठी पुढीलप्रमाणे कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे :-

जिल्हा परिषदेचे नाव/पंचायत समितीचे नाव : रायगड जिल्हा परिषद, सभेची वेळ व तारीख- दि.१३/०७/२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता, सभेचे ठिकाण-जिल्हाधिकारी कार्यालय, नियोजन भवन सभागृह, आरक्षणाचे प्रारुप प्रसिध्द करण्याचा दिनांक- दि.१५/०७/२०२२, आरक्षणाबाबत जिल्हाधिकारी/संबंधित तहसिलदार यांच्याकडे हरकती व सूचना सादर करण्याचा कालावधी- दि.१५/०७/२०२२ ते दि.२१/०७/२०२२.

पंचायत समिती, अलिबाग : सभेची वेळ व तारीख- दि.१३/०७/२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता, सभेचे ठिकाण- जंजिरा सभागृह, पोलीस मुख्यालय अलिबाग, आरक्षणाचे प्रारुप प्रसिध्द करण्याचा दिनांक- दि.१५/०७/२०२२, आरक्षणाबाबत जिल्हाधिकारी/संबंधित तहसिलदार यांच्याकडे हरकती व सूचना सादर करण्याचा कालावधी- दि.१५/०७/२०२२ ते दि.२१/०७/२०२२.

पंचायत समिती, मुरुड : सभेची वेळ व तारीख- दि.१३/०७/२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता, सभेचे ठिकाण- नानासाहेब धर्माधिकारी सभागृह पंचायत समिती कार्यालय दरबार हॉल मुरुड, आरक्षणाचे प्रारुप प्रसिध्द करण्याचा दिनांक- दि.१५/०७/२०२२,आरक्षणाबाबत जिल्हाधिकारी/ संबंधित तहसिलदार यांच्याकडे हरकती व सूचना सादर करण्याचा कालावधी- दि.१५/०७/२०२२ ते दि.२१/०७/२०२२.

पंचायत समिती, पेण : सभेची वेळ व तारीख- दि.१३/०७/२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता, सभेचे ठिकाण- तहसिलदार कार्यालय सभागृह पेण, आरक्षणाचे प्रारुप प्रसिध्द करण्याचा दिनांक- दि.१५/०७/२०२२,आरक्षणाबाबत जिल्हाधिकारी/संबंधित तहसिलदार यांच्याकडे हरकती व सूचना सादर करण्याचा कालावधी- दि.१५/०७/२०२२ ते दि.२१/०७/२०२२.

पंचायत समिती, पनवेल : सभेची वेळ व तारीख- दि.१३/०७/२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता, सभेचे ठिकाण- क्रांतीवीर वासूदेव बळवंत फडके नाटयगृह पनवेल, आरक्षणाचे प्रारुप प्रसिध्द करण्याचा दिनांक- दि.१५/०७/२०२२,आरक्षणाबाबत जिल्हाधिकारी/संबंधित तहसिलदार यांच्याकडे हरकती व सूचना सादर करण्याचा कालावधी- दि.१५/०७/२०२२ ते दि.२१/०७/२०२२.

पंचायत समिती, उरण : सभेची वेळ व तारीख- दि.१३/०७/२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता, सभेचे ठिकाण- पंचायत समिती सभागृह, उरण, आरक्षणाचे प्रारुप प्रसिध्द करण्याचा दिनांक- दि.१५/०७/२०२२,आरक्षणाबाबत जिल्हाधिकारी/संबंधित तहसिलदार यांच्याकडे हरकती व सूचना सादर करण्याचा कालावधी- दि.१५/०७/२०२२ ते दि.२१/०७/२०२२.

पंचायत समिती, कर्जत : सभेची वेळ व तारीख- दि.१३/०७/२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता, सभेचे ठिकाण- प्रादेशिक कृषी संशोधन केंद्र कर्जत, चार फाटा कर्जत येथील सभागृह, आरक्षणाचे प्रारुप प्रसिध्द करण्याचा दिनांक- दि.१५/०७/२०२२,आरक्षणाबाबत जिल्हाधिकारी/संबंधित तहसिलदार यांच्याकडे हरकती व सूचना सादर करण्याचा कालावधी- दि.१५/०७/२०२२ ते दि.२१/०७/२०२२.

पंचायत समिती, खालापूर : सभेची वेळ व तारीख- दि.१३/०७/२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता, सभेचे ठिकाण- सरनौबत नेताजी पालकर सभागृह, तहसिल कार्यालय खालापूर,आरक्षणाचे प्रारुप प्रसिध्द करण्याचा दिनांक- दि.१५/०७/२०२२,आरक्षणाबाबत जिल्हाधिकारी/संबंधित तहसिलदार यांच्याकडे हरकती व सूचना सादर करण्याचा कालावधी- दि.१५/०७/२०२२ ते दि.२१/०७/२०२२.

पंचायत समिती, रोहा : सभेची वेळ व तारीख- दि.१३/०७/२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता, सभेचे ठिकाण- कै.द.ग.तटकरे सभागृह पंचायत समिती रोहा,आरक्षणाचे प्रारुप प्रसिध्द करण्याचा दिनांक- दि.१५/०७/२०२२,आरक्षणाबाबत जिल्हाधिकारी/संबंधित तहसिलदार यांच्याकडे हरकती व सूचना सादर करण्याचा कालावधी- दि.१५/०७/२०२२ ते दि.२१/०७/२०२२.

पंचायत समिती, सुधागड : सभेची वेळ व तारीख- दि.१३/०७/२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता, सभेचे ठिकाण- श्री.बल्लाळेश्वर देवस्थान, भक्त निवास क्र.१ सुधागड, आरक्षणाचे प्रारुप प्रसिध्द करण्याचा दिनांक- दि.१५/०७/२०२२,आरक्षणाबाबत जिल्हाधिकारी/संबंधित तहसिलदार यांच्याकडे हरकती व सूचना सादर करण्याचा कालावधी- दि.१५/०७/२०२२ ते दि.२१/०७/२०२२.

पंचायत समिती, माणगाव : सभेची वेळ व तारीख- दि.१३/०७/२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता, सभेचे ठिकाण- मध्यवर्ती प्रशासकीय भवन सभागृह,पहिला मजला,तहसिल कार्यालय माणगाव, आरक्षणाचे प्रारुप प्रसिध्द करण्याचा दिनांक- दि.१५/०७/२०२२,आरक्षणाबाबत जिल्हाधिकारी/संबंधित तहसिलदार यांच्याकडे हरकती व सूचना सादर करण्याचा कालावधी- दि.१५/०७/२०२२ ते दि.२१/०७/२०२२.

पंचायत समिती, तळा : सभेची वेळ व तारीख- दि.१३/०७/२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता, सभेचे ठिकाण- नानासाहेब धर्माधिकारी सभागृह, पहिला मजला, पंचायत समिती कार्यालय तळा, आरक्षणाचे प्रारुप प्रसिध्द करण्याचा दिनांक- दि.१५/०७/२०२२,आरक्षणाबाबत जिल्हाधिकारी/संबंधित तहसिलदार यांच्याकडे हरकती व सूचना सादर करण्याचा कालावधी- दि.१५/०७/२०२२ ते दि.२१/०७/२०२२.

पंचायत समिती, महाड : सभेची वेळ व तारीख- दि.१३/०७/२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता, सभेचे ठिकाण- बहुउद्देशीय सभागृह,डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय स्मारक महाड,ता.महाड, आरक्षणाचे प्रारुप प्रसिध्द करण्याचा दिनांक- दि.१५/०७/२०२२,आरक्षणाबाबत जिल्हाधिकारी/ संबंधित तहसिलदार यांच्याकडे हरकती व सूचना सादर करण्याचा कालावधी- दि.१५/०७/२०२२ ते दि.२१/०७/२०२२.

पंचायत समिती, पोलादपूर : सभेची वेळ व तारीख- दि.१३/०७/२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता, सभेचे ठिकाण- कै.बॅ.नाथ पै.सभागृह पंचायत समिती कार्यालय पोलादपूर, आरक्षणाचे प्रारुप प्रसिध्द करण्याचा दिनांक- दि.१५/०७/२०२२,आरक्षणाबाबत जिल्हाधिकारी/संबंधित तहसिलदार यांच्याकडे हरकती व सूचना सादर करण्याचा कालावधी- दि.१५/०७/२०२२ ते दि.२१/०७/२०२२.

पंचायत समिती, श्रीवर्धन : सभेची वेळ व तारीख- दि.१३/०७/२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता, सभेचे ठिकाण- मध्यवर्ती प्रशासकीय भवन, पहिला मजला, तहसिल कार्यालय श्रीवर्धन, आरक्षणाचे प्रारुप प्रसिध्द करण्याचा दिनांक- दि.१५/०७/२०२२, आरक्षणाबाबत जिल्हाधिकारी/संबंधित तहसिलदार यांच्याकडे हरकती व सूचना सादर करण्याचा कालावधी- दि.१५/०७/२०२२ ते दि.२१/०७/२०२२.

पंचायत समिती, म्हसळा: सभेची वेळ व तारीख- दि.१३/०७/२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता, सभेचे ठिकाण- पंचायत समिती सभागृह, पंचायत समिती कार्यालय म्हसळा, आरक्षणाचे प्रारुप प्रसिध्द करण्याचा दिनांक- दि.१५/०७/२०२२, आरक्षणाबाबत जिल्हाधिकारी/संबंधित तहसिलदार यांच्याकडे हरकती व सूचना सादर करण्याचा कालावधी- दि.१५/०७/२०२२ ते दि.२१/०७/२०२२.

जिल्हा परिषद अथवा पंचायत समितीतील ज्या रहिवाशांची सदर सभेस हजर राहण्याची इच्छा आहे, त्यांनी वरील ठिकाणी व वेळी हजर राहावे, असे जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांनी कळविले आहे.

# धार्मिक तेढ निर्माण होईल अशी कोणतीही गोष्ट करू नका : तानाजी नारनवर

**दै.रायगड नगरी । नागोठणे**



येथील सर्व समाज बांधव एकोप्याने नांदतात, एकमेकांच्या सणांमध्ये सहभागी होतात हा नागोठण्याचा इतिहास आहे. त्यामुळे कुणातरी एखाद्या व्यक्तीच्या सोशल मिडीयावरील चुकीच्या पोस्टमुळे सर्वांची माने कलुषित होतात. त्यामुळे कोणताही वादग्रस्त प्रकार लक्षात येताच पोलिसांना कळवा, कायदा हातात घेऊ नका तसेच धार्मिक तेढ निर्माण होईल अशी कोणतीही गोष्ट करू नका अशा महत्वपूर्ण सूचना नागोठण्याचे पोलीस निरीक्षक तानाजी नारनवर यांनी शांतता समितीच्या बैठकीत दिल्या.

आगामी आषाढी एकादशी, बकरी ईद व गुरुपौर्णिमा या सणांच्या पार्श्वभूमीवर नागोठणे पोलीस ठाण्यात मंगळवारी(दि.५) सायंकाळी संपन्न झालेल्या या बैठकीला राष्ट्रवादीचे विभागीय नेते भाई टके, विलास चौलकर, मोहन नागोठणेकर, बिलाल कुरेशी, अशपाक पानसरे, संतोष गायकवाड, सद्दाम दाफेदार, मंगेश तेरडे, ज्ञानेश्वर साळुंखे, धनंजय जगताप, चेतन कामथे, अकबर पठाण, प्रमोद जांबेकर, पप्पू अधिकारी, दिनेश घाग, मुजफ्फर कडवेकर, हुसेन पठाण, दानिश अधिकारी, हे.कॉ. विनोद पाटील आदींसह सर्वपक्षीय कार्यकर्ते, पत्रकार व नागरिक उपस्थित होते.

बकरी ईदची कुर्बानी बंदिस्त जागेत करणे, गोवंश जातीच्या प्राण्यांची बेकायदेशीर वाहतूक व कत्तल याची माहिती समजताच पोलिसांना कळविणे, सध्याच्या राजकीय घडामोडींवर दुसऱ्या पक्षांवर टीका न करणे, व्हाटस ॲप, फेसबुक, इन्स्टाग्राम आदी सोशल मिडीयाचा वापर जपून करणे, वादग्रस्त पोस्ट न पसरविणे, लॉटरी लागली, कार बक्षीस लागलीय अशा खोट्या मेसेजला प्रतिसाद न देणे, ओटीपी न सांगणे, बँकेच्या नावाने येणाऱ्या खोट्या फोनला बळी न पडणे अशा विविध प्रकारच्या सूचना यावेळी पो.नि. नारनवर यांनी या बैठकीत दिल्या. तसेच येथील छ. शिवाजी महाराज चौकात रस्त्यालगतच बसणाऱ्या भाजी विक्रेत्यांमुळे भविष्यात एखादा मोठा अपघात घडण्याची शक्यता असल्याने त्यावर कार्यवाही करणे, जिओ इंटरनेट केबलच्या कामात येथील मुख्य रस्त्याला पडलेला खड्डा ठेकेदाराला सांगून बुजविण्यात यावा अशाप्रकारच्या अनेक सूचनाही यावेळी नागरिकांतून करण्यात आल्या. या बैठकीचे आभारप्रदर्शन पो. हे.कॉ. विनोद पाटील यांनी केले.

# वीजेपासून राहा सावध.. दामिनी ॲप करील मदत..!

मान्सूनपूर्व आणि मान्सूनच्या सुरुवातीच्या कालखंडात विशेषतः माहे मे, जून व जुलै तसेच मान्सून पश्चात साधारणतः माहे ऑक्टोबर या महिन्यात राज्यात अनेक ठिकाणी विजेच्या कडकडाटांसह पूर्वमौसमी पाऊस हजेरी लावतो. मान्सून दाखल झाल्यावर साधारणतः पहिल्या पावसात शहरी भागाबरोबरच विशेष करुन ग्रामीण भागात वीज कोसळून अनेक शेतकरी व नागरिकांना आपला जीव गमवावा लागतो. वीज पडण्याच्या घटनेतील जीवितहानी कमी करण्यासाठी किंबहुना टाळण्यासाठी काही ठोस उपाययोजना सुरु आहेतच. तथापि यावरचा एक उपाय म्हणजे पृथ्वी विज्ञान मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली आणि पुण्यातील भारतीय उष्णप्रदेशीय हवामान संशोधन संस्था (आयआयटीएम) यांच्या संयुक्त प्रयत्नांनी वादळी पाऊस, विजांच्या कडकडाटाचा अचूक अंदाजाची पूर्वसूचना नागरिकांना मिळावी, याकरिता हे ॲप विकसित केले आहे. दामिनी ॲपसाठी आयआयटीएमने लाइटनिंग लोकेशन नेटवर्क हे मॉडेल विकसित केले आहे. या ॲपच्या माध्यमातून त्यांच्या परिसरातील वादळी पाऊस, विजांच्या कडकडाटाचा अचूक अंदाज पंधरा मिनिटे ते अर्धा तास आधी नागरिकांना घरबसल्या मिळणार आहे. त्यामुळे वादळी वाऱ्यांसह येणारा पाऊस आणि वीज पडल्यामुळे होणारी नागरिकांची जीवितहानी टाळणे शक्य होणार आहे.

मान्सून दाखल झाल्यावर साधारणतः पहिल्या पावसात शहरी भागाबरोबरच विशेष करुन ग्रामीण भागात वीज कोसळून अनेक नागरिकांना आपला जीव गमवावा लागतो. यामध्ये विशेषतः शेतकरी व शेत मजूरांची संख्या अधिक आहे. विजांसह होणाऱ्या पावसाचे पूर्वानुमान शेतकऱ्यांना व नागरिकांना काही वेळ अगोदर समजावे, यासाठी हे दामिनी ॲप उपयोगी ठरणार आहे.

माहिती संकलनासाठी विविध भागात सेन्सर बसविण्यात आले आहेत. या ॲपमुळे शेतकरी, नागरिकांना वादळी पाऊस, विजांच्या कडकडाटाचे पंधरा मिनिट ते अर्धा तास आधी अचूक अंदाज मिळू शकतो. हे ॲप जीपीएस (GPS) लोकेशन ने काम करीत असून वीज पडण्याच्या १५ मिनिटांपूर्वी या पमध्ये प्रभावित होण्याची शक्यता असलेल्या क्षेत्राची दिशादर्शक स्थिती दर्शविण्यात येते. विजा पडण्याची शक्यता तसेच वीज म्हणजे नेमके काय, वीज कोसळणे याची शास्त्रीय माहिती आणि विजेपासून वाचण्यासाठी नागरिकांनी काय करायला पाहिजे, याचीही सविस्तर सचित्र माहिती दामिनी ॲपमध्ये देण्यात आली आहे.

या ॲपवर लोकेशन टाकल्यानंतर संबंधित भागात वादळी वारे अथवा विजेच्या गडगडांची शक्यता असल्यास ती माहिती बघायला मिळते.

या माहितीच्या आधारावर शेतकरी व नागरिक वेळीच सावध होऊन त्यांचा जीव वाचवू शकतात.

तरी जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी आणि नागरिकांनी हे ॲप गुगल प्ले स्टोर मध्ये Damini Lightning Alert असे टाईप करून डाऊनलोड करावे तसेच स्थानिक पातळीवर गावस्तरीय कर्मचारी, तलाठी, ग्रामसेवक, कृषी सहायक, शिक्षक, स्थानिक लोकप्रतिनिधी यांनीही हे प स्वत:डाऊनलोड करावे तसेच सामान्य नागरीक / शेतकरी यांनाही हे ॲप डाऊनलोड करण्यास मार्गदर्शन करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर, निवासी उपजिल्हाधिकारी डॉ.पद्मश्री बैनाडे व जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी सागर पाठक यांनी केले आहे.

**मनोज शिवाजी सानप**
**जिल्हा माहिती अधिकारी,**
**रायगड-अलिबाग**

**पृष्ठ क्र.१ वरुन...**

## प्लास्टिक बंदीची कठोर अंमलबजावणी सुरू

महापालिकेला सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. यावेळी सहाय्यक आयुक्त वैभव विधाते उपस्थित होते.

प्लास्टिक बंदीची अमंलबजावणी करण्याकरिता महापालिकेच्यावतीने चारही प्रभागामध्ये विविध पथके तयार करण्यात आली आहे. ही पथके त्या त्या ठिकाणी असणाऱ्या सॅनिटरी इन्स्पेक्टरच्या नेतृत्वाखाली काम करत आहेत. या कारवाईमध्ये पहिला गुन्हा नोंद झाल्यावर ५ हजार रुपये, दुसरा गुन्हा नोंद झाल्यावर १० हजार रुपये ,तिसरा गुन्हा नोंद झाल्यावर २५ हजार रूपये दंड आणि तीन महिन्याचा कारावास असणार आहे.

महाराष्ट्र प्लास्टिक व थर्माकोल अधिसूचना २०१८ अंतर्गत खालील अतिरिक्त एकल वापर प्लॅस्टिकचा वापर मार्च२०१८ पासूनच प्रतिबंधित आहेत यामध्ये सर्व प्रकारच्या प्लास्टिकच्या पिशव्या (कॅरी बॅग्स) - हॅंडल असलेल्या व नसलेल्या कंपोस्टेबल व प्लास्टिक ( कचरा व नर्सरीसाठीच्या पिशव्या सोडून) सर्व प्रकारच्या नॉन- ओव्हन बॅग्स (पॉलीप्रोपिलीन पासून बनविलेले), एकल वापर प्लास्टिकचे उत्पादन - डिश, बाउल, कॅन्टेनर (डबे) (हॉटेलमध्ये अन्नपदार्थ पॅकेजिंगकरीता) यावरती बंदी असणार आहे.

अ) प्लास्टिकच्या कांडयासह कानकोरणी, फुग्यांसाठी प्लॉस्टिकच्या कांडया, प्लास्टिकचे झेंडे, कॅंडी, कांडया, आईस्क्रीम कांडया. ब) सजावटीसाठी प्लास्टिक व पॉलिस्टीरीन (थर्माकोल ) यावरती बंदी असणार आहे. क) प्लेटस, कप, ग्लासेस, कटलरी, जसे काटे, चमचे चाकू, पिण्यासाठी स्ट्रॉ, ट्रे, ढवळण्या, (स्टिरर्स), मिठाईचे बॉक्स, आमंत्रण कार्ड, सिगारेटची पाकीटाभोवती प्लास्टिक फिल्म गुंडाळणे किंवा पॅक करणे, प्लास्टिकच्या पीव्हीसी बॅनर (१०० मायक्रॉन पेक्षा कमी) यावर बंदी असणार आहे.

## मुसळधार पावसाचा फटका; जुने माणगांव पाणी पुरवठा लाईन उखडली

कर्मचारी चंद्रकांत सोंडकर यानी प्रत्यक्ष जागेची पाहणी करुन दिली आहे.

माणगांवचे पाणी पूरवठा सभापती राजेश मेहता या ठिकाणी जातीने लक्ष घालुन आहेत. पाईप जोडणीचे काम प्राथमिकतेने सुरु करण्याच्या सूचना त्यांनी संबंधित कर्मचाऱ्यांना दिल्या असुन नागरिकांना झालेल्या तसदी बद्दल दिलगीरीही व्यक्त केली आहे. तसेच सध्या पावसाचा जोर जास्त असुन नळाला येणारे पाणी गाळुन उकळुनच पिण्यासाठी वापरावे. सर्वांनी काळजी घ्यावी व पावसाळी दिवसात नगर पंचायतला सहकार्य करावे असे माणगांवकरांना विनम्र आवाहन केले आहे.

## संभाव्य नैसर्गिक आपत्तीसाठी कर्जत नगर परिषद प्रशासन सज्ज

यांच्या चोवीस तास ड्युटया लावण्यात आल्या आहेत.नियंत्रण कक्षाचा नंबर ०२१४८-२२२०३३ व ०२१४८-२२११११ असा आहे.

नगराध्यक्षा सुवर्णा जोशी यांनी नैसर्गिक आपत्ती सांगून येत नाही मात्र आली तर त्यावर मात करण्यासाठी नगरपरिषद यंत्रणा सज्ञ आहे असे सांगितले, नैसर्गिक आपत्ती येऊच नये अशी आपण सर्व जण देवाकडे प्रार्थना करू असे त्यांनी सांगितले.उपस्थित नागरिकांपैकी विकास यांनी विचार मांडले तर सुमित गुरव यांनी मागील पूर परिस्थितीचा अनुभव पाहता आपल्याकडे बोट पाहिजे असे सांगितले. याप्रसंगी विकास चित्ते, विष्णू कडू, जयंतीलाल परमार, सुमित गुरव, शैलेश सातपुते,रमेश ओसवाल, अभिजित मोरबेकर, अक्षय गुप्ता,स्वप्नील नामदास आदी सह नगरपरिषद कर्मचारी उपस्थित होते.

## पाली स्मशानभूमीची दुरवस्था ; मृतदेहाची होतेय हेळसांड

फुटलेले असल्याने पावसात मृतदेहावर अंत्यसंस्कार करतांना खूप मोठी गैरसोय होते. स्वच्छता व इतर कामांसाठी कायमस्वरूपी माणसाची नेमणूक नाही. त्यामुळे नेहमी अस्वच्छता असते. ही स्मशानभूमी दारुड्यांचा अड्डा झाला आहे. शिवाय पालीतील एकमेव लाकडांची वखार बंद झाल्याने मृतदेह जाळण्यासाठी नागोठणे येथे जावे लागते. यासाठी अधिकचा वेळ व पैसा जातो. एकूणच स्मशानभूमीची प्रचंड दुरवस्था झाली आहे. पावसाळ्यात मृतदेहावर अंत्यसंस्कार करणे जिकरीचे झाले आहे. या सगळ्याचा याचा हकनाक त्रास मृतांचे नातेवाईक व लोकांना होत आहे.

# मुरुड समुद्रकिनारी, जिवंत लॉगहेड जातीचे कासव सापडले

**दै.रायगड नगरी । मुरुड**

मुरुड समुद्रकिनारी सर्पमित्र संदीप घरत यांना जिवंत लॉगहेड जातीचे कासव सापडले. हे कासव पंधरा किलो वजनाचे होते.

सर्पमित्र घरत यांनी तातडीने वनखात्याला संपर्क करुन बोलावून घेतले. वन खात्याच्या मदतीने समुद्री कासवाला पुन्हा सुखरूप समुद्रामध्ये सोडून दिले.



# गोशीन रियू कराटेच्या विद्यार्थ्यांची राज्य स्तरावर निवड

**दै.रायगड नगरी । उरण**

पनवेल तालुका क्रीडा संकुल येथे आयोजित राष्ट्रीय किक बॉक्सिंग दिना निमित्ताने जिल्हा स्तरीय किक बॉक्सिंग स्पर्धा घेतल्या गेल्या त्यामध्ये गोशीन रियू कराटेच्या उरण व पनवेल तालुक्यातील विद्यार्थ्यांनी विविध वजनी गटात पदके मिळविली. अमिता अरुण घरत गोल्ड मेडल, अमिषा अरुण घरत गोल्ड मेडल, रोहित शरद घरत गोल्ड मेडल, शुभम म्हात्रे गोल्ड मेडल, अमर घरत सिल्व्हर मेडल, करण प्रदीप पाटील सिल्व्ह मेडल, अंश राजेंद्र म्हात्रे ब्रॉन्झ मेडल अशी पदके पटकाविली आहेत.

पदक विजेते उमेदवारांची अहमदनगर येथे होणाऱ्या राज्यस्तरीय किकबॉक्सिं स्पर्धेत निवड झाली आहे.सदर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन शिहान राजु कोळी, गोपाळ म्हात्रे, राकेश म्हात्रे यांनी केला. तसेच या स्पर्धेत मानसी ठाकूर, संतोष मोकळ, ईशा जैन, महेंद्र कोळी राजेश कोळी यांनी पंच म्हणून काम केले. या स्पर्धेचे प्रमुख पाहुणे म्हणून संपत्ती येलकर आणि जेयेश चोगल उपस्थित होते.

# जनरल चेकअप शिबिराचे आयोजन

**दै.रायगड नगरी । पनवेल**

ग्रेसफुल हॅंड्स ट्रस्ट यांच्या वतीने बालग्राम आश्रम येथे जनरल चेकअप शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराला प्रमुख अतिथी म्हणून विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे हे उपस्थित होते. यावेळी संस्थेच्या या उत्कृष्ठ कार्याबद्दल प्रितम म्हात्रे यानी त्यांचे अभिनंदन केले.

यावेळी बँक ऑफ महाराष्ट्रचे अधिकारी अरविंद मोरे, डॉ.सविता काळेल, डॉ.सारिका खाडे-पाळसकर, बालग्राम आश्रमातील अधिकारी, कर्मचारी, बालके, संस्थेचे अध्यक्ष सौ.पायल माधोक, अंगना रॉय तसेच संस्थेचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.




हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## खंडणीसाठी ११ वर्षीय मुलाचे अपहरण

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल भागात राहणाऱ्या एका कामगाराने त्याच्याबरोबर काम करणाऱ्या कामगारांच्या ११ वर्षीय मुलाचे अप-हरण करून त्याच्याकडे ३० हजार रुपयांच्या खंडणीची मागणी केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. तनवीर असे या आरोपीचे नाव असून पनवेल शहर पोलिसांनी त्याच्याविरोधात खंडणीसह अपहरणाचा गुन्हा दाखल करून त्याचा शोध सुरु केला आहे.

या घटनेतील तक्रारदार पनवेल भागात पत्नी व तीन मुलांसह राहतो. तक्रारदार कामगार आपल्या कामावर गेला असताना त्याच्याबरोबर काम करणारा कामगार आरोपी तनवीर याने तक्रादाराच्या ११ वर्षीय मुलाला खाण्यास देण्याच्या बहाण्याने सोबत घेतले. त्यानंतर त्याचे अपहरण केले. त्यानंतर कामगाराने त्याने मुलाची शोधाशोध सुरु केल्यानंतर त्याच्या मुलाला तनवीर याने सोबत नेल्याची माहिती त्याला मिळाली.त्यामुळे त्याने आरोपी तनवीर याच्या मोबाईलवर संपर्क साधून त्याच्या मुलाला घरी घेऊन येण्यास सांगितले; मात्र आरोपी तनवीर याने तक्रारदाराकडे ३० हजार रुपयांची मागणी केली; अन्यथा त्याच्या मुलाला मारण्याची धमकी दिली अखेर या पीडित कामगाराने पनवेल शहर पोलीस ठाण्यात धाव घेऊन तक्रार दाखल केली. त्यानुसार पोलिसांनी आरोपी तनवीर याचा शोध सुरु केला आहे.

## डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांना अभिवादन

**दै.रायगड नगरी । पनवेल**

थोर राष्ट्रीय नेते, शिक्षणतज्ञ, भारतीय जनसंघाचे संस्थापक डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांच्या जयंतीनिमीत्त पनवेल भाजप कार्यालयात भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, पनवेल तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, उत्तर रायगड जिल्हा संघटन सरचिटणीस अविनाश कोळी, जिल्हा उपाध्यक्ष प्रल्हाद केणी, तालुका उपाध्यक्ष सचिन पाटील, युवा मोर्चाचे तालुकाध्यक्ष आनंद ढवळे, यांच्यासह इतर पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी विनम्र अभिवादन केले.



## मोबाईल हिसकावून चोरटे पसार

**दै.रायगड नगरी । पनवेल**

मोटरसायकल वरून आलेल्या अनोळखी ईसमानी तीस वर्षे तरुणाच्या हातातील मोबाईल खेचून ते पसार झाले आहेत. या प्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

वडघर- करंजाडे येथे राहणारे राजेश कुमावत हे ४ जुलै रोजी तबेल्यात दूध आणण्यासाठी निघाले. सेक्टर नंबर दोन ए येथील जिल्हा परिषद शाळा चिंचपाडा समोर आले असता त्यांच्या डाव्या हातात मोबाईल होता.

यावेळी पाठीमागून एका मोटरसायकलवर दोघेजण आले व पाठीमागे बसलेले इसमाने राजेश यांच्या हातातील मोबाईल हिसकावला व ते मोटरसायकल वरून पळून गेले.

## भर पावसात सुध्दा श्री पिसारनाथ पॅनेल मतदारांच्या भेटीला



**दै.रायगड नगरी । माथेरान**

माथेरान नागरी सहकारी पतसंस्थेची निवडणूक ११ जुलै रोजी होणार असल्याने पिसारनाथ पॅनेलच्या काँग्रेस, शिवसेना आणि भारतीय जनता पक्षाच्या आघाडीच्या सर्व उमेदवारांनी आपल्या कार्यकर्त्यांसोबत दि.५ रोजी ग्रामदैवत श्री पिसारनाथ महाराज मंदिरात जाऊन दर्शन घेतले. तर दि.६ जुलै पासून प्रचारादौऱ्याला सुरुवात केली आहे. चार दिवस जोरदार पर्जन्यवृष्टी असताना देखील भर पावसात ह्या पॅनेलचे उमेदवार आणि कार्यकर्ते मतदारांच्या भेटी घेत आहेत.

एकूण बाराशे मतदार संख्या असलेल्या या पतसंस्थेत राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसेनेचा एक गट मिळून शिवराष्ट्र पॅनेल या निवडणुकीला सामोरे जात आहेत त्यामुळे ही निवडणूक दुरंगी होणार असल्याने ही निवडणूक सर्वच राजकीय पक्षांच्या नेत्यांसाठी आता प्रतिष्ठेचा विषय बनला आहे.

आगामी नगरपरिषदेच्या निवडणुकीसाठी ही निवडणूक सुध्दा जिंकणे महत्त्वाचे असल्याने दोन्ही पॅनल आपापल्या परीने मतदारांना आकर्षित करण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करणार आहेत. कधी नव्हे ते या पतसंस्थेच्या निवडणुकीला महत्त्व प्राप्त झाले आहे त्यामुळे सर्वांचे या निवडणुकीकडे डोळे लागले आहेत.

# आ.आदिती तटकरे यांच्या आमदार निधीतून १० लक्ष किमतीचे शालेय प्रयोगशाळा साहित्यांची देणगी

**दै.रायगड नगरी । तळा**

श्रीवर्धन विधानसभा मतदारसंघाच्या आमदार तथा माजी पालकमंत्री आमदार अदिती तटकरे यांच्या आमदार निधीतून सुमारे १० लक्ष रुपये किमतीचे शालेय प्रयोगशाळा साहित्य तळे विभाग शिक्षण प्रसारक मंडळ या संस्थेला देणगी रूपाने देण्यात आले त्याचा उद्घाटन सोहळा संस्थेच्या प्रयोगशाळा कार्यालयात दि. ०६/०७/२०२२ रोजी आ. आदिती तटकरे यांच्या शुभहस्ते करण्यात आला.



याप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष तथा उपनगराध्यक्ष श्री. चंद्रकांत रोडे, नगराध्यक्ष अस्मिता भोरावकर, तालुका राष्ट्रवादी काँग्रेस अध्यक्ष नाना भौड, अल्पसंख्यांक जिल्हा अध्यक्ष अँड. उत्तम जाधव, संस्थेचे उपाध्यक्ष पुरुषोत्तम मुळे, सेक्रेटरी मंगेश देशमुख, कनिष्ठ महाविद्यालय चेअरमन श्रीराम कजबजे, प्राथमिक शाळा चेअरमन किरण देशमुख, मा.रा. शिर्के, दीपक कोटिया, नगरसेवक मंगेश शिगवण, प्रकाश गायकवाड, अविनाश पिसाळ, महिला तालुका अध्यक्ष जान्हवी शिंदे, युवती प्रमुख सायली दळवी, बबन भौड, सौ. माधुरी घोलप, सौ. ग्रीष्मा बामणे, पुष्पा नागे, सारिका गवळी, चंद्रकांत भोरवकर, सौ सुतार इत्यादी नगरसेवक कार्यकर्ते उपस्थित होते.

प्रथम संस्थेचे अध्यक्ष श्री. चंद्रकांत रोडे यांनी संस्थेच्या प्रगतीचा आढावा घेत असताना या संस्थेवर नेहमीच माननीय खासदार सुनील तटकरे, आमदार अनिकेत तटकरे व आपण स्वतः प्रेम केलेले आहे. वेगवेगळ्या फंडातून या संस्थेला आर्थिक मदत देऊन संस्थेची प्रगती साधली आहे. जुनियर कॉलेज, वरिष्ठ महाविद्यालय यांना परवानगी मिळवून दिलीच, पण अनुदान मिळवून देण्यासाठी देखील बहुमोल कामगिरी केली आहे. या संस्थेचे असणारे पन्हाळी हायस्कूल येथील शिक्षकांना देखील ४०% अनुदान प्राप्त झाले आहे, यामागे आपला प्रयत्न आहे. आज प्रथमच आपल्या आमदार फंडातून १० लाख रुपयांचे शालेय प्रयोगशाळा साहित्य प्राप्त होत असून, आपल्या शिक्षणाकडे पाहण्याचा दृष्टिकोन नक्कीच सुंदर आहे. असे सांगत, तळे नगरपंचायत ग्रामीण रुग्णालय, तालुका क्रीडांगण यासारख्या गोष्टींना आपण दिलेला निधी नक्कीच मिळाल्यामुळे, आज तळा शहराचा विकास होत आहे. असे प्रास्ताविकेत सांगताना इतर कामांचाही उल्लेख केला आहे.

आपले मनोगत व्यक्त करताना आमदार आदिती तटकरे म्हणाल्या, गेल्या दोन वर्षात कोविड काळात मला मिळणारा निधी कोविड साहित्यसाठी वापरला, तसा शासनाने निर्णय घेतला होता. परंतु यावेळी आमदार फंड देखील वाढल्यामुळे मी माझ्या फंडातील ५० लाख रुपये शिक्षणासाठी खर्च करावयाचा असा निर्णय घेताना तळा, इंदापूर, म्हसळा, श्रीवर्धन व रोहा या पाच तालुक्यातील शाळांना यावर्षी शालेय प्रयोगशाळा साहित्य देऊन शिक्षणाकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलण्याचा प्रयत्न केला आहे. शिक्षण ग्रामीण भागापर्यंत पोहोचले पाहिजे येणारा आजचा तरुण शैक्षणिक दृष्ट्या सक्षम होऊन तो उद्याचा कर्तबगार नागरिक पाहावयास मिळाला पाहिजे. माझ्याकडे मी मंत्री असताना आठ खाती होती, त्या प्रत्येक खात्याला योग्य न्याय देण्याचे काम केलेले आहे. या संस्थेला सौर ऊर्जेसाठी मी नक्कीच सहकार्य करेन. तालुका क्रीडांगणाचा दुरुस्तीसाठी ५० लाख रुपये निधी जिल्हा क्रीडा अधिकारी यांच्याकडे वर्ग केलेला आहे. त्यामधून तळा तालुका क्रीडांगण दुरुस्ती करता येईल. आपण संस्थेने माझे सूचनेवरून तळा येथे जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शन घेऊन जिल्ह्याला तळ्याची वेगळी ओळख करून दिलीत. अतिशय सुंदर प्रकारे हे विज्ञान प्रदर्शन पार पडले. तुम्ही सारे तालुक्यातील मंडळी या संस्थेचे पदाधिकारी नेहमीच आमचे पाठीशी ठामपणे राहिला आहात. त्याचा आनंद होत आहे. छोट्या छोट्या मुलांच्या शैक्षणिक सुविधेकडे लक्ष देता देता आले, त्याचे समाधान वाटते. यापुढे देखील आम्ही आपले पाठीशी राहू. संस्थेचा विकास नेहमीच छान लागलेला पाहताना हे साहित्य देण्याची इच्छा झाली. तुमचे सर्वांचे असेच प्रेम सदैव लाभो. असे मौलिक विचार आमदार आदिती तटकरे यांनी व्यक्त केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्राध्यापक नितीन पाटील यांनी तर आभार प्रदर्शन प्राध्यापक सुहास वावेकर यांनी मानून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

## कौशल्यवृद्धी उपजिविका प्रशिक्षण कार्यक्रम संपन्न

**दै.रायगड नगरी । खांब-रोहा**

रोहे तालुक्यातील देवकान्हे ग्रा.पंचायत व सम्रुद्वी शिक्षण संस्था महाड यांच्या विद्यमाने महिला सक्षमीकरण करण्यासाठी कौशल्यवृद्धी उपजिविका प्रशिक्षण कार्यक्रम मोठ्या उत्साहात संपन्न करण्यात आला.

येथील सरपंच वसंत भोईर यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झालेल्या या कार्यक्रम प्रसंगी उपसरपंच सूरज कचरे सदस्य दयाराम भोईर, रविंद्र राऊत, ज्ञानेश्वर वाघमारे, पूजा गोसावी आदिती थिटे, मृण्मयी बामणे, निवासिनी थिटे, निलिमा भोईर, रिया भोईर, पार्वती पवार, कृषी सहाय्यक अधिकारी सारिका दिघे-सावंत, ग्रा.वि.अधिकारी स्नेहा पिंपळकर, सी.आर. पी.प्रियंका पवार, मोनिका हातकामकर, प्रणिता जाधव, सामाजिक कार्यकर्ते पांडुरंग गोसावी, विनायक गोसावी आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते.

या प्रशिक्षण कार्यक्रमातंर्गत उपस्थित महिलांना अगरबत्ती, मेणबत्ती व फिनेल तसेच अन्य घरगुती उत्पादने बनविण्याचे प्रशिक्षण, व्यवसायासाठी लागणारे भांडवल, व्यवसायात मिळणारा नफा तसेच व्यवसाय वृद्धीसाठीचे कौशल्ये आदींबाबत महत्त्वपूर्ण मार्गदर्शन समृद्धी शिक्षण संस्था महाड यांच्यावतीने करण्यात आले.

## नविन पनवेलला ड्रेनेजचे पाणी रस्त्यावर

**दै.रायगड नगरी । पनवेल**

नविन पनवेल सेक्टर १३ येथील दत्तमंदिर समोर ड्रेनेज लाईनची साफसफाई झालेली नसून पहिल्याच पावसात येथिल चेंबर भरुन ड्रेनेजचे पाणी रस्त्यावरून वाहत आहे. दरवर्षी सिडकोकडून या ठिकाणी पंप बसविला जातो व चेंबरमध्ये साचलेले जास्त पाणी जवळच्या गटारी मध्ये पंपाच्या साहाय्याने सोडले जाते. मात्र यावेळी महापालिका प्रशासनाने या ठिकाणी पंप बसविला नसल्यामुळे ड्रेनेजचे पाणी रस्त्यावर वाहत आहे.

पनवेल महापालिका हददित बहुतांशी ठिकाणी गटर साफसफ़ाई व्यवस्थित झाली नसल्याचा आरोप विरोधी पक्ष आणि नागरिक करत आहेत.

नवीन पनवेलच्या रस्त्यावर मोठ्या प्रमाणात नागरिकांची तसेच बांठीया शाळेतील विद्यार्थ्यांची वर्दळ असते. यामुळे येथील नागरिकांच्या आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. येथील मेन लाईनचे चेंबर भरले की सेक्टर १३ मधील बैठ्या चाळीतील आतील चेंबर ही भरतात.

यामुळे येथिल बहुतांशी नागरिकांच्या घरात सुध्दा ड्रेनेजचे पाणी शिरते. यामुळे पालिका प्रशासनाने येथे पंप बसवावा. अशी मागणी येथिल नागरिकांकडून केली जात आहे.

## अतिवृष्टी काळात जिल्हा प्रशासनाकडून दिल्या जाणाऱ्या सूचनांचे नागरिकांनी पालन करण्याचे आवाहन

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

भारतीय हवामान खात्याने दिलेल्या पूर्वसूचनेनुसार दि.०८ जुलै २०२२ रोजी पर्यंत रेड अलर्ट दिलेला आहे. त्यामुळे रायगड जिल्ह्यातील सखल व दरडप्रवण गावातील नागरिकांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.

त्यानुसार जिल्ह्यातील सखल व दरडप्रवण गावातील नागरिकांनी भरतीच्या वेळी अतिवृष्टी होत असल्यास तात्काळ सुरक्षित ठिकाणी आश्रयास जावे, समुद्र खवळलेल्या स्थितीत असल्याने मच्छिमारांनी, पर्यटकांनी व नागरिकांनी समुद्रात पोहण्यास जावू नये, पूर व दरडप्रवण भागातील नागरिकांनी आपली महत्वाची कागदपत्रे, मौल्यवान दागिने सुरक्षित ठिकाणी ठेवावेत, पुढील ०३ दिवस अतिवृष्टीचा इशारा असल्याने घरातील वयोवृध्द व्यक्ती, आजारी व्यक्तींसाठी आवश्यक औषधे, पिण्याचे पाणी, टॉर्च, मेणबत्ती, माचिस, ड्राय फूड यांचा पुरेसा साठा करुन ठेवावा, पावसाळ्यात पाणी दूषित होण्याची शक्यता असते, त्यामुळे पिण्याचे पाणी उकळून प्यावे, महिला, लहान मुले यांची काळजी घ्यावी.

तरी जिल्ह्यातील सखल व दरडप्रवण गावातील नागरिकांनी जिल्हा प्रशासनाकडून वेळोवेळी देण्यात येणाऱ्या सूचनांचे पालन करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांनी केले आहे.


**शुद्धीपत्रक क्र.१**

**(ई-निविदा सूचना क्र.१५ सन २०२२-२३)**

**संदर्भ : या कार्यालयाची ई-निविदा जा.क्र.अवि/लेशा/ निविदा/४१०७/२०२२ दिनांक २२/०६/२०२२**

| पुर्वीचा कालावधी | सुधारीत कालावधी |
|---|---|
| ई-निविदा उपलब्ध कालावधी :- दि.२९/०६/२०२२ (स.१0.00 वा.) ते दि.१३/०७/२०२२ (संध्या. ६.00 वा.) | ई-निविदा उपलब्ध कालावधी :- दि.०६/०७/२०२२ (स.१0.00 वा.) ते दि.२०/०७/२०२२ (संध्या. ६.00 वा.) |
| ई-निविदा उघडणे :- दि.१९/०७/२०२२ (दु.३.00 वा.) (शक्य झाल्यास) | ई-निविदा उघडणे :- दि.२६/०७/२०२२ (दु.३.00 वा.) (शक्य झाल्यास) |

*निविदेतील/निविदासुचनेतील इतर बदल महाराष्ट्र शासनाच्या http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर पहावे ही विनंती.

जा.क्र.अवि/लेशा/निविदा/४४२९/२०२२
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,
सा.बां.विभाग, अलिबाग, जि.रायगड
दिनांक : ०५/०७/२०२२

सही/-
(ज.ई.सुखदेवे)
कार्यकारी अभियंता,
अलिबाग (सा.बां.) विभाग,
जि.रायगड



**जाहीर नोटीस**

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, मौजे : खानाव, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड येथील १) श्री.एकनाथ भागाजी जाधव, २) श्री.चंद्रकांत भागाजी जाधव यांचे मालकीची व ताबेकब्जातील खालील वर्णनाची जमीन मिळकत आमचे अशिलांनी कायम स्वरुपात विकत घेण्याचा विचार केलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे : खानाव, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड**

| सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| ३३ | ६ | ०-३४-० पैकी ०-१७-० | ३.९४ |

सबब वर नमूद शेतजमीन मिळकतीवर किंवा मिळकतीच्या कोणत्याही भागावर अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, कुळ वहिवाट, ताबा, कब्जा, इजमेंट, साठेकरार, फरोक्त, गहाण, दान, बोजा, बक्षिस, चार्ज, लाज वगैरे कोणत्याही प्रकरचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसांचे आत हक्क हितसंबंधाचे स्वरुप विषद करून कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्यावर लेखी हरकती रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात अगर समक्ष येवून भेटावे. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा वगैरे न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारची हरकत, तक्रार, दावा, हितसंबंध नाही असे समजून आमचे अशिल सदर वर नमूद मिळकतीचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी दावे आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत, याची तमाम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

दि.०६/०७/०२२

सही/-
अॅड.प्रवीण दत्तू पाटील
हरिओम नगर, फ्लॅट नंबर बी-२,
तळमजला, कफ नगर, ठाणा नाका,
जुने पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड
मो.नं.९९२०९९५९९६



**शुद्धीपत्रक**

दै.रायगड नगरी या वृत्तपत्रात दि.२ जुलै २०२२ रोजी अॅड.भुषण म्हात्रे यांनी दि.चौ.अर्ज नं.५३/२०२२ अन्वये अर्जदार श्रीमती.दर्शना सुरेश कडू यांच्या वारस दाखल्यासंदर्भात जाहीर नोटीस प्रसिद्ध करण्यात आली होती. त्यामध्ये अतिरिक्त जिल्हा न्यायाधिश यांचे नाव पालदेवकर साहेब असे प्रसिद्ध करण्यात आले होते. ते **अतिरिक्त जिल्हान्यायधिश पालदेवार साहेब** असे वाचण्यात यावे, असे या शुद्धीपत्रकाद्वारे जाहीर करण्यात येते.



Hon'ble Mujawar Judge
Adv.Somnath Gaikwad
Adv.V.A.Mathew

**PUBLIC NOTICE**

IN THE COURT OF HON'BLE CIVIL JUDGE (S.D.) PANVEL, AT PANVEL

Misc Application No.955/2022
Exh : 8/D
Next Date : 28/09/2022

Mr.Zacharia Jacob Kunnappally — Applicant
V/s
Mr.Joseph Jacob Kunnappally & or. — Respondents

IN THE MATER OF HEIRSHIP CERTIFICATE OF THE DECEASED JACOB JOSEPH KUNNAPPALLY @ K.JOSEPH JACOB, WHO EXPIRED ON 03-07-2013 AT BANDRA, MUMBAI

WHEREAS the above named deceased JACOB JOSEPH KUNNAPPALLY, owned and occupied and possessed 50% (Jointly) of a residential Flat bearing, bearing No.Tower No.1E, Flat 1301, Indiabulls, Sector 02, Kon Village, Panvel having 93.57 Sq. Mtrs, Carpet area, within the territorial jurisdiction of this Hon'ble Court, falling in the Panvel Village within the Registration District Raigad and Sub-District of Panvel, Taluka Panvel, Dist-Raigad in the State of Maharashtra.

The Applicant herein above named had filed an application for issuing a "HEIRSHIP CERTIFICATE" in his favour, submitting that there is nobody else being claimant/s for the said property.

Notice is hereby issued that of anybody is having any claim upon the said property.

Notice is hereby issued that if anybody is having any claim upon the said property/ residential flat they are hereby called upon to approach the office of the Hon'ble Court within 30 (Thirty) days of publication of this notice.

Panvel
Date : 5/07/2022

Sd/- Jr.Clerk Civil Court (S.D.) Panvel — Court Seal — Sd/- Asst.Superitent. Civil Court (S.D.) Panvel



श्री.मुजावर साो

**प्रो.जमा.५०/-** **अॅड.विक्रम पाटील अर्जदाराचे वकील**

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.१०२३/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.१६/०८/२०२२

१) सौ.अर्चना प्रशांत पाटील
वय : ४१ वर्षे, धंदा : गृहिणी
मु.कणे, पो.वाशी, ता.पेण, जि.रायगड
२) सौ.प्रतिभा सुरेश पाटील
वय : ३८ वर्षे, धंदा : गृहिणी
मु.फनसापूर, पो.बापले, ता.अलिबाग, जि.रायगड
३) सौ.अपर्णा आकाश पाटील
वय : ३५ वर्षे, धंदा : गृहिणी
मु.फोपेरी रोड, पो.मांडवखार, नारंगी, जि.रायगड
४) सौ.रिना विजय पाटील
वय : ३४ वर्षे, धंदा : गृहिणी
मु.पेंधर, पो.नावडे, ता.पनवेल, जि.रायगड
५) सौ.मनिषा अनिल म्हात्रे
वय : २९ वर्षे, धंदा : गृहिणी
मु.पिसार्वे, पो.तळोजा मजकूर, ता.पनवेल, जि.रायगड
६) सौ.संपुर्णा रुपेश म्हात्रे
वय : २६ वर्षे, धंदा : गृहिणी
मु.जसखार, ता.पनवेल, जि.रायगड
७) श्रीमती.हाशीबाई तुकाराम पाटील
वय : ८८ वर्षे, धंदा : गृहिणी
मु.धाकटा खांदा, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही — सामनेवाले

तमाम जनतेस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, कै. विष्णू तुकाराम पाटील हे दि.१९/०१/२०२२ रोजी मृत्यू पावले असून त्यांचे मौजे : पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड येथील खालील वर्णनाच्या मिळकतीबाबत वारस दाखला मिळणेकरिता अर्जदार यांनी अर्ज केलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| युनिट केस नं. | सर्व्हे नं. | हि.नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|
| पनवेल-३६६ अ (२) | ११५ | २/१ | ०-२८-६० | 0.00 |

अर्जदार क्र.१ ते ७ हे कै.विष्णू तुकाराम पाटील यांचे, कायदेशीर वारसदार आहेत. त्यांच्या हक्काबद्दल कोणाही व्यक्तीस हरकत घ्यावयाची असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एका महिन्याच्या आत ह्या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून अगर त्यांच्या वकीलांमार्फत त्यांच्या हरकती सादर कराव्यात. विहित मुदतीमध्ये हरकत सादर न केल्यास ना.कोर्ट योग्य त्या पुराव्यानिशी वरील अर्जदार यांस वारस दाखला प्रदान करतील, मुदतीनंतर येणाऱ्या हरकती ग्राह्य धरल्या जाणार नाहीत.

आज दि.६/०७/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यनिशी दिली.

**सही/- क.लिपीक दि.न्याया, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/- सहा.अधिक्षक दि.न्याया, पनवेल**

# संक्षिप्त...

## शौचालयाजवळ आढळा मृतदेह

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल रेल्वे स्टेशन बाहेरील शौचालयाजवळ एका इसमाचा मृतदेह आढळून आला असून, त्याच्या नातेवाईकांचा शोध पनवेल शहर पोलिस करीत आहेत.

सदर इसमाचे अंदाजे वय ३५ ते ४० वर्षे, वर्ण सावळा, उंची सुमारे ५ फूट, नाक सरळ, चेहरा उभट, केस काळे, दाढी व मिशी बारीक असून, डाव्या हाताच्या मनगटावर गोंधवलेले आहे. त्याच्या अंगात राखाडी रंगाचा शर्टव नीळी पँट आहे. या इसमा बाबात कोणाला अधिक माहिती असल्यास पनवेल शहर पोलिस ठाणे दूरध्वनी ०२२-२७४५२३३३ किंवा सहाय्यक पोलिस निरीक्षक अनिल देवळे यांच्याशी संपर्क साधावा.

## महिलेची आत्महत्या

**दै.रायगड नगरी । पनवेल**

इमारतीच्या ३२ व्या मजल्या वरून उडी मारून आत्महत्या केल्याचा प्रकार इंडियाबुल्स कोन येथे घडला आहे.

सुचित्रा साहू (वय ६२) असे या मृत महिलेचे नाव आहे. या महिलेने आत्महत्या का केली याचा तपास पोलीस करत आहेत. या घटनेची नोंद पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

## ४ जणांनी मिळून सुपरवायझर सह त्याच्या भावाला केली मारहाण

**दै.रायगड नगरी । पनवेल**

४ जणांनी मिळून सुपरवायझर सह त्याच्या भावाला मारहाण केल्याची घटना तालुक्यातील आजीवली येथील विंन्टस फार्मवर्क प्रा.लि. येथे घडली आहे.

या ठिकाणी असलेले सुपरवायझर नरेशकुमार साहेबकुवर कुमार (वय २२) याला त्याचा भाऊ हरेरामसकाळी जोरात ओरडतो ह्या गोष्टीचा राग मणात धरून येथे कामकरणारे नरीफूल इस्लाम, सुक्तारआलमउर्फ सुत्तूर उर्फ सुत्तार अफसर अली, सोहेल समाउल हक व बानीज अब्दुल रेहमान या चार आरोपींनी त्या दोघांना शिवीगाळ करुन ढोश्या बुक्नयाने मारहाण करुन त्यांना दुखापत केल्याने याबाबतची तक्रार पनवेल तालुका पोलिस ठाण्यात करण्यात आली आहे.

### वाचकांना विनम्र सूचना

**दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.**

# एटीएममधून पैसे चोरणारी पाचजणांची टोळी पोयनाड पोलिसांकडून जेरबंद

**दै.रायगड नगरी । पेण**

पोयनाड पोलीस ठाणे येथील आर.डी.सी.सी बँक मधील एटीएम मधुन पैसे चोरीच्या गुन्हयाची उकल करुन पाच जणांना पोयनाड पोलिसांनी शिताफिने जेरबंद केले आहे.

सोनु कुमार सरजुप्रसाद गौतम वय-२४ मुळ रा.उमरच पो. जेठवाडा ता. लालगंज जि.प्रतापगड राज्य उत्तरप्रदेश, सध्या रा. फादरवाडी, बसई फाटा जि.पालघर यास गुन्हयातील फिर्यादी आर. डी.सी.सी. बँकेचे व्यवस्थापक राजेंद्र बाळाराम पाटील यांच्या सतर्कतेमुळे पकडण्यात आले होते. सदर गुन्हयाच्या तपासादरम्यान आरोपी सोनुकुमार सरजुप्रसाद गौतम याची चौकशी केली असता त्याने त्याचा वसई येथील साथीदार रणजितकुमार गोविंद प्रसाद वय-१९ राज्य. उ. प्रदेश सध्या रा पालघर असल्याचे कबुल केले.

त्यानंतर पोलीस अधिक्षक अशोक दुधे, अप्पर पोलीस अधिक्षक अतुल झेंडे, उपविभागीय पोलीस अधिकारी शुक्ला यांचे नेतृत्वाखाली पोयनाड पोलिस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक राहुल अतिग्रे यांनी टीम तयार करुन रणजितकुमार गोविंद प्रसाद याला पालघर येथून ताब्यात घेतले. त्याची चौकशी केली असता त्याने वडखळ, पेण येथील जमील छेदी शेख वय १८ रा. मौआईमा, नई बस्ती, जि.ईलाहाबाद राज्य. उ. प्रदेश सध्या रा.वडगाव ता. पेण, जितेंद्र विनोद सिंग वय २३ रा. गायघाट रोड, दहीलामड्डु, प्रतापगढ राज्य. उ. प्रदेश सध्या रा. चिंचपाडा ता.पेण, विशाल राजेंद्र यादव वय २८ रा. वडखळ ता. पेण हे आणखी तीन साथीदार असल्याचे सांगितले.

त्यानुसार त्यांना देखील वडखळ तसेच पेण येथून ताब्यात घेवून अटक केली आहे. सदर गुन्हयाचा तपास सहायक फौजदार दुष्यंत जाधव हे करीत आहेत.

आरोपी चोरी करताना एकजण एटीएममध्ये पैसे चोरी करण्याकरीता प्रवेश करतो. तर इतर चौघे बाहेर टेहेळणी करत थांबत असत. आत ए.टी.एम. मध्ये प्रवेश करणारा आरोपी स्क्रूड्रायव्हरने सदर ए.टी.एम. मशीनचे पैसे बाहेर येण्याचे शटर उचकटून-उपकुन आपल्याकडील मशीन सदर शटर मध्ये मशीनमध्ये घुसवीत असत. त्याच्या सहायाने बाहेर आलेली रक्कम शटरमध्ये घुसवलेल्या मशीनच्या सहायाने बाहेर खेचुन सदर पैसे लंपास करीत असल्याचे तपासात निष्पन्न झाले. यातील सर्व आरोपीत हे आळीपाळीने अशा चोऱ्या करत असल्याचे तसेच वयस्कर गोरगरीब ज्यांना ए.टी.एम वापरण्याचे माहीत नाही अशा लोकांच्या अज्ञानाचा फायदा घेवून सदर आरोपीत हे पैसे काढून देतो असे त्यांना विश्वासात घेवून त्यांच्या कडील एटीएम चा पासवर्ड माहीती करुन घेवून चलाखीने त्यांचा ए.टी.एम. बदलुन त्यांच्या कार्ड मधून पैशाची चोरी करीत असल्याचेही सखोल तपासात निष्पन्न झाले आहे. या आरोपींकडून स्क्रुड्रायव्हर, पैसे काढण्यासाठी बनवलेली लोखंडी पत्र्याची मशीन तसेच वेगवेगळ्या बँकेचे एकूण ३२ ए.टी.एम. डेबीट कार्ड जप्त करण्यात आले आहेत.

या प्रकरणात सहा पोलीस निरीक्षक राहुल अतिग्रे यांच्यासह पोलिस उपनिरीक्षक एम.टी. जाधव, सहायक फौजदार दुष्यंत जाधव, सहा. फौजदार रामचंद्र ठाकूर, पोलिस नाईक अक्षय पाटील, पोलिस शिपाई किशोर चव्हाण यांचा सहभाग होता.

# कर्जत नगरपरिषद क्षेत्रात नगराध्यक्षा व मुख्याधिकारी यांचा पाहणी दौरा




**दै.रायगड नगरी । माथेरान**

हवामान खात्याने पुढील काही दिवस मुसळधार पावसाचा दिलेला इशारा लक्षात घेता तसेच सध्या देखील पावसाचा जोर वाढल्याने पूर परिस्थिती निर्माण होऊन जीवित व मालमत्तेची हानी होऊ नये म्हणून शासन,प्रशासनाने सज्ज राहण्याचे निर्देश दिले आहेत या पार्श्वभूमीवर काल दि.५ जुलै रोजी सायंकाळी नगराध्यक्षा सुवर्णा जोशी व मुख्याधिकारी सुरेखा भणगे यांनी नगरपरिषद क्षेत्रात पाहणी केली.

नगरपरिषद क्षेत्रात मुद्रे बुद्रुक गावठाण भाग, गुंडगे, भिसेगाव या भागात अतिवृष्टीमुळे भुस्खलन, दरड कोसळ्याचे प्रकार पूर्वी झाले होते त्या परिसरात पाहणी केली व त्यांना तात्पुरते स्थलांतर करण्याबाबत सूचना दिल्या आहेत. नगरपरिषद क्षेत्रातील मुख्य नाले, गटारे यांची साफ सफाई योग्य झाली आहे का याची पाहणी केली.नदी परिसरातील भागाची पाहणी केली.

चार फाटा ते न्यू बिकानेर रस्ता हा रस्ता भिसेगाव मध्ये जातो या रस्त्याचे काम अर्धवट आहे म्हणजे रस्त्याची एक बाजू पूर्ण झाली आहे तो रस्ता सध्या रहदारी साठी सुरू आहे मात्र पावसाळ्यात आजू बाजूला पाणी साठल्याने चालकाला रस्त्याचा अंदाज न आल्याने दोन दिवसापूर्वी चारचाकी वाहन हे रस्त्याच्या खाली उतरले होते त्या रस्त्याची पाहणी करून पावसाळ्यात हा रस्ता वन वे करण्याचा निर्णय घेतला आहे.याबाबत त्याठिकाणी फलक लावण्यात येतील असे मुख्याधिकारी सुरेखा भणगे यांनी सांगितले.

नगराध्यक्ष सुवर्णा जोशी व मुख्याधिकारी सुरेखा भणगे यांनी कर्जत नगर परिषद क्षेत्रात ज्या ठिकाणी फिरल्या त्या ठिकाणीचे स्थानिक नगर-सेवक सोमनाथ ठोंबरे, बळवंत घुमरे, नगरसेविका वैशाली मोरे, संचिता पाटील, माजी नगरसेवक संतोष पाटील यांच्या सह पाहणी केली, यावेळी नगर अभियंता मनिष गायकवाड, नगर रचना लक्ष्मण माने, सुदाम म्हसे, सुनिल लाड नगरपरिषद कर्मचारी उपस्थित होते.

# विमानतळाच्या भरावामुळे पनवेल तालुक्यातील डुंगी गावात दीड ते दोन फूट पाणी साचले

**दै.रायगड नगरी । पनवेल**

विमानतळाच्या भरावामुळे पनवेल तालुक्यातील डुंगी गावात दीड ते दोन फूट पाणी साचले आहे. तर काहींच्या घरात पाणी गेल्यामुळे त्यांचे नुकसान झाले आहे. गेल्या तीन ते चार वर्षांपासून डुंगी गावात पाणी येत असल्याचे ग्रामस्थांनी सांगितले. विमानतळाचा भराव यासाठी कारणीभूत असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. गेल्या वर्षी मोठ्या प्रमाणात पाणी घरांमध्ये शिरले होते. त्याचा फटका नागरिकांना बसला. कित्येकांचे हजारो रुपयांचे नुकसान या पाण्यामुळे झाले. विमानतळासाठी करण्यात येत असलेल्या भरावामुळे डुंगी गावात पाणी साचते.

पनवेलमध्ये नवी मुंबई विमानतळामुळे पनवेल परिसराला ग्लॅमर येऊन विकासाची गंगा येणार आहे. मात्र या विमानतळासाठी होत असलेल्या भरावामुळे दरवर्षी पूरग्रस्त परिस्थिती उद्भवत आहे. त्याचबरोबर विमानतळाच्या भरावामुळे आजूबाजूचा परिसर सुद्धा पाण्याखाली जात आहे. मौजे पारगाव डुंगी तसेच बंबावी कोळीवाडा येथे विमानतळाच्या गाभा क्षेत्र साठी करण्यात आलेल्या मातीच्या भरावामुळे येथील नागरिकांच्या राहत्या घरात पाणी जाऊन अतोनात नुकसान होत आहे. डुंगी गावाच्या अगदी लगत करण्यात आलेल्या विमानतळाच्या भरावामुळे गावापेक्षा भराव हा उंचीवर गेला आहे भरावानंतर झालेल्या गेल्या वर्षीच्या पावसात मोठ्या प्रमाणात पाणी शिरल्यामुळे भविष्यात काय परिस्थिती उद्भवेल या भीतीने ग्रामस्थ चिंताग्रस्त असतात. सिडको प्रशासनाने याबाबत कायमस्वरूपी उपाययोजना करण्याची गरज असल्याचे मत प्रमोद नाईक त्यांनी व्यक्त केले. विमानतळासाठी करण्यात आलेल्या भरावामुळे परिसरातील डुंगी गावांमध्ये गेल्या वर्षी पाणी शिरले होते. त्यामुळे नागरिकांमध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण झाली आहे. सिडकोच्या नियोजन शून्य कारभारामुळे डुंगी गावावर ही परिस्थिती ओढवले असल्याचे नागरिक सांगतात.



# पोलादपूर तालुक्यात 'वल्गन' लागली!...अन् चढणीचे मासे पकडण्यासाठी मासेखाऊंची लगबग



**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

तालुक्यात गेल्या ४८ तासांत मुसळधार पाऊस पडून नाल्यांची पात्र दुथडी भरून नदीकडे वाहू लागली असून या नदीपात्रालगतच्या चढणीवर नाल्या-शेतात अंडी-पिल्ले सोडण्यास येणाऱ्या माशांची वलगन लागली आहे. ग्रामस्थ तसेच आदिवासी बांधवांनी ही वलगनीची गोडया पाण्याची मासळी पकडण्यासाठी नेहमीप्रमाणे सुसज्जता ठेवली असून एकीकडे तालुक्यातील वारकरी माळकरी जनता चातुर्मासाचे नियम पाळत असते; तेवढयाच संख्येने मासेखाऊंची चढणीचे म्हणजेच वलगनीचे मासे पकडून मुसळधार पावसाची साजरी करण्यासाठी लगबग सुरू आहे.

पोलादपूर तालुक्यात सावित्री, कामथी, घोडवनी, चोळई आणि ढवळी या पाच प्रमुख नद्यांची पात्रं अद्याप पुरेसा पाऊस न पडल्याने उथळच दिसत आहेत. गेल्या दोन तालुक्यात पावसाचा जोर वाढल्यामुळे नाल्यांची पात्रं दुथडी भरल्यानंतर नदीकडे येणाऱ्या ओहोळातून तसेच शेतीच्या पाण्याच्या पाटातून विरूध्द दिशेने शेताकडे जाऊन उथळ व संथ पाण्यात अंडी अथवा पिले सोडणाऱ्या माशांनी अंडी सोडण्यासाठी उलटा प्रवास करण्यास वलगन असे गावाकडे म्हणतात. खेडेगावांतील ग्रामस्थ आणि आदिवासी बांधवांनी ही वलगनीची मासळी पकडण्यासाठी पागविणे, बांधणं घालणे, खोचेरे मारणे आणि जाळयात पकडण्याचे विविध मार्ग अवलंबिले आहेत. तालुक्यातील प्रदुषणरहित गोडया पाण्यातील वांब, सकला, कटला, मुरगी, अहिर, खडशी, भिंग, मळयाचे मासे, शिंगटया, टोलकी, डाकू मासा, शिवडयाचे पातं असे मासे तसेच किरवी किंवा मुरी, मुठे (पांढरी खेकडी), झिंगे, चिंबोरी (लाल खेकडी)हे अष्टपाद उभयचर मांसाहारी खवैय्यांच्या जीभेवर वेगळीच अवीट चव रेंगाळत ठेवत असल्याने परगावी राहणाऱ्या पोलादपूरकरांना त्यांच्या ग्रमीण जीवनाच्या आठवणीच्या काळातील वलगनीचे विशेष अप्रुप वाटत असते.

पोलादपूर तालुक्यातील मळयाचे मासे मुंबईकर चाकरमान्यांना एस.टी.बसेसमधून तळून डब्यांतून पाठविली जात असून बस मुंबईत पोहोचण्यापूर्वीच हे डबे घेण्यासाठी चाकरमानी मुंबईतील संबंधित स्थानकावर वाटदेखील पाहात असतात. महाड व पोलादपूर तालुक्यातील मत्स्यप्रेमी खवय्ये आवर्जून कापडे बुद्रुकच्या नरवीर तानाजी मालुसरे कमानीखाली बसलेल्या आदिवासी महिलांकडून अव्वाच्या सव्वा दर मोजून वेगवेगळया प्रकारचे मासे खरेदी करताना दिसत आहेत. पोलादपूरच्या महाबळेश्वर रस्त्यालगतच्या मोरीच्या कठडयावर येणाऱ्या आदिवासी महिलांच्या टोपलीतील ताजे तडफडीत मासे खवय्यांचे खास आकर्षण ठरत असल्याने दिवसाकाठी दोन-चार खेपा मारणाऱ्या मासेखाऊंच्या मासेपुराणाच्या गप्पादेखील मनाजोगते मासे मिळेपर्यंत सुरू असतात. यंदा मांसाहारी विशेषत: मत्स्याहारींमध्ये आषाढ महिन्यातील आखाड सुरू असून मासेखाऊंनादेखील अधिक मासे मिळत असल्याने वलगन करण्याचा उत्साह सगळीकडे दिसून येत आहे. प्रसिध्द नाटककार साहित्यिक तसेच राज्याचे सेवानिवृत्त माहिती संचालक प्रल्हाद जाधव यांनी 'पाण्यातले दिवस' या पुस्तकामध्ये पोलादपूर तालुक्यातील बालपणीच्या वास्तव्यातील सावित्री नदीसह अन्य नद्यांमध्ये आढळून येणाऱ्या मत्स्यसृष्टीचे वर्णन नदीपात्रालगतच्या भ्रमंतीसह आढळून येत असल्याने पोलादपूर तालुक्यातील या वलगनीच्या माशांना साहित्य क्षेत्रातही स्थान प्राप्त झाले आहे.

# प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजना अंतर्गत ई-केवायसी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवण्यासाठी केंद्र शासनाने सुरू केलेली प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेचा मोठ्या प्रमाणात देशातील शेतकऱ्यांना होत आहे. या योजनेंतर्गत लाभार्थी शेतकऱ्यांची ई-केवायसी करण्यात येत असून तालुका कृषीखाते व शेतकरी सन्मान कक्ष (पनवेल तालुका) यांच्या मार्फत गुळसुंदे येथे नुकताच मोहिम पार पडली तसेच असंघटीत कामगारांसाठी इ-श्रम कार्ड नोंदणी करण्यात आली.

उपक्रमासाठी कृषी पर्यवेक्षक प्रसाद पाटील,शेतकरी सन्मान कक्ष सदस्य कृषीभुषण मीनेश गाडगीळ, शेतकरी मित्र गणपत गोठळ, ग्रामस्थ योगेश साठे, वैभव भोइर, यांचे सहकार्य लाभले. १ फेब्रुवारी २०१९ रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली केंद्र सरकारद्वारे शेतकऱ्यांसाठी प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेचा शुभारंभ करण्यात आला. प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेच्या माध्यमातून केंद्र सरकारकडून देण्यात येणारी एकूण सहा हजाराची रक्कम तीन हप्त्यांमध्ये थेट लाभार्थी शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा केले जात आहेत.

भारत एक कृषि प्रधान देश आहे. भारतातील ७५ टक्के लोक शेती करतात किंवा शेतीवर अवलंबून आ-हेत. ही गोष्ट लक्षात घेऊन भारत सरकारने शेतकऱ्यांना आर्थिक मदत पोहचविण्यासाठी प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेची सुरूवात केली.

या योजनेच्या माध्यमातून शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावणे व त्यांना आत्म निर्भर बनवणे तसेच त्यांना सशक्त करणे हे या योजनेचे मुख्य उदिष्ट आहे. त्या अनुषंगाने १० कोटीहून अधिक शेतकऱ्यांना या योजनेचा फायदा होत आहे. या योजनेचा शेतकऱ्यांना अखंडपणे लाभ मिळावा, यासाठी शासनाकडून लाभार्थींच्या कागदपत्रांची ई केवायसी करण्यात येत आहे.

# बेशिस्त वाहन चालकामुळे कोप्रोली -खोपटा मार्गावर वाहतूक कोंडी



**दै.रायगड नगरी । उरण**

उरण तालुक्यातील उरण पूर्व भागाला जोडलेल्या खोपटा पूल ते कोप्रोली मार्गावर कंटेनर ट्रेलर पार्कींग करून ठेवल्याने अशा बेशिस्त वाहन चालकांमुळे विद्यार्थी आणि नोकर वर्गाला तीन ते चार तास वाहतूक कोंडीचा सामना करावा लागला आहे. काही विद्यार्थी व कामगारांना भर पावसात आप आपल्या घराकडे चालत जावे लागले आहे. त्यामुळे या मार्गावरील दररोजच्या वाहतूक कोंडीतून सुटका कोण देणार असा सवाल विद्यार्थी आणि नोकर वर्ग विचारत आहे.

उरण तालुक्यात जेएनपीटी च्या अनुषंगाने मोठं मोठे उद्योग धंदे सुरू झाले आहे. अनेक सिएफ एस, एमटी कंटेनर यार्ड आणि गोदामे निर्माण झाली आहेत. त्यातच उरणच्या पूर्व भागही सिएफ एस आणि गोदामे वसविली आहे.त्यामध्ये कॉन्टिनेटल, अमेया लॉजीस्टिक, न्यू ट्रान्स इंडिया, विरगो यार्ड, ग्लोबीकॉन असे मुख्य आणि छोटी गोदामे एमटी यार्ड ही वसविले आहेत. या कंपन्यांमध्ये माळ भरण्यासाठी किंवा कंटेनर नेण्यासाठी आलेली ट्रेलर चालक आपल्या गाड्या ह्या रस्त्यावरच पार्क करून ठेवण्यात धन्यता मानत आहेत. त्यामुळे सिंगल रोड असलेल्या रस्त्यावरून जेमतेम दोन गाड्या पास होतात .रस्ता अरुंद असल्याने वाहने जाण्या येण्यासाठी जागाच शिल्लक उरत नाही आणि त्यात बेशिस्त वाहन चालकामुळे तर आणखी वाहतूक कोंडी बरोबर अपघात होत आहे.

या बाबत जर ट्रेलर चालकाचे विचारले तर आमचे डिओ आले नाही आम्हाला लेटर आले नाही जर गोदाम मालकाकडे जर गोदामांमध्ये जर पार्किंगची जागा नसेल किंवा परवानगी नसेल तर ट्रेलर का मागविले जात आहेत. असा सवाल ही यावेळी उपस्थित केला जात आहे.मात्र उद्भवणाऱ्या वाहतूक कोंडीचा त्रास हा नाहक सर्वसामान्य जनतेला सहन करावा लागत आहे. मुसळधार पाऊस पडत होता. त्यामुळे विद्यार्थी व कामगार वर्ग आप आपल्या घरा कडे लवकरच जाण्यासाठी धडपडत असताना संध्याकाळी खोपटा कोप्रोली मार्गावर मोठी वाहतूक कोंडी झाली. विद्यार्थी आणि कामगार वर्ग या वाहतूक कोंडी मध्ये जवळजवळ तीन तास अडकून पडेला होता. मात्र तीन तास एकही वाहतूक पोलीस हजर नसल्याने अनेकांना याचा त्रास सहन करावा लागला. या कोंडीतून विद्यार्थी व नागरिक पावसात भिजत घरा कडे चालत जाताना दिसत होता. तरी आर.टी.ओ.आणि वाहतूक पोलीस यंत्रणेने खोपटा गावाजवळील रस्त्यावर पार्किंग करुन ठेवलेल्या गाड्यांवर, कंटेनर यार्ड वर कारवाईचा बडगा उगारावा अशी मागणी विद्यार्थी वर करीत आहेत.

# विद्यार्थ्यांचे फणसाडमध्ये पावसाळी पर्यटन

**दै.रायगड नगरी । मुरुड**

नैसर्ग वनसंपदेने नटलेल्या शहरी गजबजाटापासून दूर वृक्ष वेलींनी नटलेल्या एका नीरव शांत वातावरणात जेथे पाऊस जवळून अनुभवता येतो अशा फणसाड वन्यजीव रक्षक अभयारण्यात मजगावच्या नज कॅडमी हायस्कूल व मुरुडच्या सुविद्या इंग्रजी माध्यमाच्या शाळांनी आपल्या विद्यार्थ्यांसाठी पावसाळी पर्यटनाचे आयोजन केले होते.

केवळ पुस्तकी अभ्यासाव्यतिरिक्त विद्यार्थ्यांना मिळालेले प्रत्यक्ष अनुभव हे वेगळेच काहीतरी शिकवून जाते याच माध्यमातून नैसर्गिक समृद्धीचा हारवा रंग, शुध्द हवा, शीतल गारवा निसर्ग किमयेचा अनुभव विद्यार्थ्यांनी या वर्षा पर्यटनातून दोन्ही शाळांतील सुमारे तीनशे विद्यार्थ्यांनी घेतला.

फणसाड अभयारण्यातील जैवविविधतेची माहिती प्रदिप बागवे यांनी यावेळी विद्यार्थ्यांना दिली. सुमारे ५४ चौ.की.मी. क्षेत्रावर पसरलेल्या या अभयारण्यात १६६ प्रजातींचे पक्षी, १७ प्रकारचे वन्यप्राणी शंभराहून अधिक प्रकारची फुलपाखरे, २८ जातीचे साप व अनेक प्रकारच्या औषधी वनस्पती असल्याच्या माहितीसह ऐन उन्हाळ्यात प्राणी व पक्षांना पिण्याच्या पाण्याची सोय म्हणून अभयारण्यात निर्माण केलेल्या बशी तलावाची माहिती ही प्रणव बागवे, किशोर सर,व दिघे यांनी विद्यार्थ्यांना यावेळी सांगितली.

फणसाड अभयारण्याचे मुख्य वनाधिकारी तुषार काळभोर, चांदेकर व अन्य वन कर्मचारी यावेळी उपस्थित होते. तर शाळेचे हिलाल हलडे, जमिर कादिरी, मतिन हमदुले, आशिष बुल्लु, शिक्षक, शिक्षिका यात सहभागी झाल्या होत्या.